**ठळक बातम्या**

- सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर मिळावं यासाठी ३० हजार कोटी रुपयांच्या निधीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी १२ हजार कोटी

- पूर्व नियोजन, कालमर्यादा, आणि विविध विभागांच्या समन्वयातून पायाभूत सुविधा विकास प्रकल्प झपाट्यानं पूर्ण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७६५ अंकांची घसरण

**आणि**

- राज्याच्या किनारी भागात आज नारळी पौर्णिमेचा उत्साह

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर मिळावं यासाठी ३० हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पेट्रोलियम कंपन्यांना नुकसानीची भरपाई म्हणून ही रक्कम दिली जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. याशिवाय प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी १२ हजार कोटी रुपयांहून अधिक निधीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सध्या या योजनेचे १० कोटी ३३ लाख लाभार्थी आहेत आणि त्यांना कमाल ९ सिलिंडरसाठी प्रति सिलिंडर ३०० रुपयांची सबसिडी दिली जाते. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी ४ हजार २०० कोटी रुपये द्यायलाही या बैठकीत मान्यता मिळाली. देशभरातल्या पावणे ३०० संस्थांना यातून मदत दिली जाईल.  आसाम आणि त्रिपुरासाठी सव्वा ४ हजार कोटी रुपयांचं विशेष पॅकेज मंत्रीमंडळानं आज मंजूर केलं.

**<><><><><>**

पूर्व नियोजन, कालमर्यादा, पारदर्शकता, गुणवत्ता आणि विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातून राज्यातले पायाभूत सुविधा विकास प्रकल्प झपाट्यानं पूर्ण करावेत असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. पुण्यात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत आयोजित पायाभूत सुविधा विकास प्रकल्प प्रशिक्षणाचं त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते.

पुणे शहरासाठी लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी, येवलेवाडी अशा पाच पोलीस स्टेशनची मागणी असून त्याला मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री त्यांनी दिली. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीनं शहरात उभारण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन आणि नवीन उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शासनानं जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राज्यात ५ टक्के अर्थात १ हजार १०० कोटी रुपये पोलीस दलासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे ग्रामीण भागासाठी पोलीस दलाला जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षात ४० कोटी रूपयांचा निधी दिला, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांना सांगितलं. खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले. तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बिहारमधे मतदारयाद्यांच्या पुनरिक्षणाबाबत चर्चेची मागणी करत विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ केला. कामकाजात व्यत्यय येत राहिला. लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र गदारोळामुळे सभापतींनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर ३ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्राप्तीकर विधेयक २०२५ मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला, तो सभागृहानं मंजूर केला. त्यानंतर खासगी सदस्यांची विधेयकं मांडली जाणार होती. मात्र घोषणा चालूच राहिल्यानं सभापतींनी दिवसभरासाठी कामकाज स्थगित केलं.

राज्यसभेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विविध मुद्द्यांवर विविध पक्षांकडून आलेले २० स्थगन प्रस्ताव फेटाळले. त्याच्या निषेधात सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. या अधिवेशनात व्यत्यय आल्यानं राज्यसभेच्या कामकाजाचे ५६ तास वाया गेले असल्याचं हरिवंश यांनी सांगितलं. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज त्यांनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित केलं.

भारत छोडो आंदोलनातल्या स्वातंत्र्यसैनिकांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आदरांजली वाहण्यात आली. महात्मा गांधींनी पुकारलेल्या या आंदोलनाला उद्या ८३ वर्ष पूर्ण होत आहेत. लोकसभेत माजी सदस्य दिवंगत सत्यपाल मलिक यांनाही आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><>**

येत्या १५ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आजपासून १५ तारखेपर्यंत हर घर तिरंगा - हर घर स्वच्छता हा विशेष उपक्रम राबवण्यात येत आहे. **भंडारा** जिल्ह्यात तुमसर इथं या उपक्रमाचा प्रारंभ आज पंचायत समिती सभागृहात करण्यात आला. **जालना** जिल्ह्यातही या उपक्रमाची सुरुवात आज झाली असून याअंतर्गत स्वच्छता, जलसंवर्धनासाठी जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात येणार आहेत. **हिंगोली** जिल्ह्यात जिल्हा पाणी

आणि स्वच्छता मिशन कक्षाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार असून जिल्ह्यातल्या नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावं असं आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आलं आहे.

<><><><>

श्रोते हो, स्वातंत्र्य दिन अवघ्या आठवडाभरावर आला आहे. आतापर्यंतच्या स्वातंत्र्य दिनाच्या तुमच्या काही आठवणी असतील तर त्या अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी आकाशवाणीनं तुम्हाला उपलब्ध करुन दिली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या संदर्भातल्या तुमच्या आठवणी सांगणारा व्हिडीओ रेकॉर्ड करा आणि फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर आमच्या airnews mumbai या अकाऊंटला टॅग करा. अधिकाधिक लोकांपर्यंत तो पोहोचवण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करू.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ७६५ अंकांची घसरण झाली, आणि तो ७९ हजार ८५८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २३३ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ३६३ अंकांवर बंद झाला.

<><><><>

आज नारळी पौर्णिमा. श्रावण पौर्णिमेला येणारा हा सण विशेषतः किनारपट्टीवरच्या मच्छिमार समाजात उत्साहानं साजरा केला जातो.

पावसाळ्यात उधाण आलेल्या समुद्राला शांत आणि प्रसन्न करण्यासाठी विधीवत नारळ अर्पण करण्यात येत आहे. आतापर्यंत बंदरात बांधून ठेवलेल्या होड्या डागडुजी आणि  रंगरंगोटी करुन पुन्हा समुद्रात हाकारायच्या, यानिमित्त कोळीवाड्यांमधे उत्सवी वातावरण आहे. मुंबईत तसंच किनारपट्टीवरच्या विविध चौपाट्या आणि बंदरावर जत्रा भरल्या आहेत.

<><><><>

धुळे इथल्या यमुनाई शैक्षणिक आणि सांस्कृतिक महिला मंडळाच्या दिव्यांग मुलींच्या शाळेतल्या विद्यार्थिनींनी पोलीस ठाण्यात रक्षाबंधन साजरं केलं. यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांनी या विद्यार्थिनींना भेटवस्तू दिल्या.

**<><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक राख्या तयार केल्या आहेत. धान्यापासून बनवलेल्या या राख्यांविषयी जाणून घेऊया आमचे वार्ताहर रमेश कदम यांच्याकडून

**-- होल्ड - हिंगोली व्हाइस कास्ट--(३१ सेकंद)**

**<><><><>**

माहिती, ज्ञान आणि मनोरंजन या उद्दिष्टासाठी प्रसारभारती कार्यरत असून अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत असल्याचं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं वेव्ज् ओटीटी मंचावरच्या नियतकालिक विक्रीचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. या मंचावर मासिक ९९ रुपये तर वार्षिक ९९९ रुपये वर्गणीवर ८ भाषांमधली मिळून ५० नियतकालिकं उपलब्ध आहेत.

**<><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावरून गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा याकरता सर्व प्रकारच्या उपाययोजना करत असल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितलं. ते आज रत्नागिरीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. या मार्गावर नऊ ते दहा ठिकाणी सुविधा केंद्रं उभारली जाणार आहेत, तसंच, मुंबई-गोवा महामार्गाचं एकंदर काम ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत पूर्ण झालं असून, रायगड जिल्ह्यातला माणगाव-इंदापूर भाग वगळता या महामार्गाचं काम येत्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करु अशी ग्वाही त्यांनी दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वरजवळचं काम रखडल्याबद्दल कंत्राटदाराला दंड आकारला असून, आता काम वेळेत झालं नाही तर कारवाई केली जाणार आहे. रस्ता सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या कामांसाठी २०० कोटी रुपयांच्या स्वतंत्र निधीचा प्रस्ताव तयार केला जात आहे, अशी माहितीही भोसले यांनी दिली.

<><><><><>

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. विदर्भात बहुतांश ठिकाणी  मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस झाला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात, मराठवाड्यात काही ठिकाणी, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//